मुंबई विद्यापीठ : मराठी विभाग
पीएच. डी. (मराठी)

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सुरू होणाऱ्या पीएच. डी. (मराठी) प्रवेशासाठी जे विद्यार्थी मुंबई विद्यापीठाची पेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, सेट/नेट किंवा एम. फिल. (मराठी) उत्तीर्ण झाले आहेत ते विद्यार्थी अर्ज सादर करू शकतात. सदर विद्यार्थी मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम० ए० (मराठी) पदवी कमीत कमी ५५ टक्के गुण आवश्यक आहेत व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुण आवश्यक आहेत.

मराठी विभागाच्या कार्यालयामध्ये दिनांक १५ मार्च २०१९ पर्यंत सकाळी १०.३० ते १ व २ ते ४.३० या वेळेत अर्ज सादर करू शकतात. (दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुट्टी असते.) प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांची नावे दिनांक २० मार्च २०१९ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. पीएच. डी. (मराठी) साठी पात्र विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा मंगळवार, दिनांक २६ मार्च २०१९ रोजी सकाळी ११ वाजता विभागाच्या कार्यालयात घेण्यात येईल. मौखिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात येतील.

विभागाचा पत्ता :

मराठी विभाग,
मुंबई विद्यापीठ,
रानडे भवन,
पहिला मजला,
विद्यानगरी,
कालिना, मुंबई ४०००९८.

खालील प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडण्यात यावी :

१) पेट/नेट/सेट/एम. फिल. (मराठी) उत्तीर्ण प्रमाणपत्र.
२) एम० ए० (मराठी) भाग १ व २ गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.
३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीचा दाखला.
४) विहित नमुन्यातील अर्जासोबत उल्लेख केलेली प्रमाणपत्रे.

**सोबत अर्जाचा नमुना जोडलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी या अगोदर लेखी स्वरूपात अर्ज विभागाकडे सादर केला असेल त्या विद्यार्थ्यांनी पुन्हा या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.**

वि. सू. : निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पीएच. डी.चे कोर्सवर्क करणे बंधनकारक असेल, हे कोर्सवर्क मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग संशोधन केंद्राच्या वेळापत्रकाप्रमाणे राहील.

(विभागप्रमुख, मराठी विभाग)